जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५९९ दिनांक - ०६/०८/२०२३**

गुन्हे शाखा,युनिट-०३, पुणे शहर

**पुणे शहरातील टेम्पो व कार चोरी करणा-या सराईत वाहन चोरास जेरबंद करून त्याचेकडुन दोन चारचाकी टेम्पो व कार असा ऐवज केला हस्तगत**

दि.०४/०८/२०२३ रोजी गुन्हे शाखा,युनिट-०३,पुणे कडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे दत्तवाडी पोलीस ठाणे हददीत गुन्हे प्रतिबंध पेट्रोलिंग करत असताना,पु.ल.देशपांडे उदयाना जवळ एक इसम चारचाकी टेम्पो मध्ये संशयीत हालचाल करीत असताना,सहा.पोलीस फौजदार,संतोष क्षिरसागर यांना दिसून आल्याने त्याचेवर पाळत ठेवून त्यास ताब्यात घेवुन,त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **अभिषेक शरद पवार,वय ३५ वर्षे,रा.७४२,गुरूवार पेठ,पुणे** असे सांगीतले. त्याबाबतचा अधिक तपास करता,नमुद आरोपी हा पोलीस अभिलेखावरील गुन्हेगार असल्याचे समजून आले. त्याचेकडे मिळून आलेल्या टेम्पोबाबत अधिक तपास करीत असताना,सदरचा टेम्पो हा त्याने काही दिवसांपुर्वी स्वारगेट परीसरातुन चोरी करून आणल्याचे कबुल केले.

नमुद आरोपीकडे केले तपासात त्याने दारूच्या व्यसनासाठी स्वारगेट,हडपसर,कात्रज या परीसरातुन चोरून सदर वाहनांचा उपयोग भाडे घेणेकरीता करून,त्यातुन मिळणा-या पैशातुन तो त्याचे दारूचे व्यसन करत असल्याचे सांगीतले. त्याचेकडून १)१,५०,०००/- रू किं.चा एक टाटा कंपनीचा अेस टेम्पो २) २,५०,०००/- रुपये किं.चा एक मारूती सुझुकी कंपनीचा टेम्पो, ३)१,५०,०००/- रुपये किं.ची एक मारूती सुझुकी कंपनीची स्वीफ्ट कार तिचा अशी तीन वाहने ५,५०,०००/- रू कि.ची मिळून आल्याने ती जप्त करण्यात आलेली आहेत. नमुद आरोपीकडून **१)स्वारगेट पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर २०६/२०२३ भादंविक ३७९ २)हडपसर पोलीस ठाणे पुणे गुन्हा रजि.नंबर १०६०/२०२३ भादंविक ३७९ ३)भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे गुन्हा रजि.नंबर ४७३/२०२३,भादंविक ३७९ असे तीन वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.**

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह-आयुक्त,पुणे शहर,श्री.संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त, गुन्हे,पुणे शहर,श्री.अमोल झेंडे यांचे मार्गदर्शनाखाली मा.सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-१,पुणे शहर,श्री.सुनिल तांबे गुन्हे शाखा,युनिट-०३ चे प्रभारी अधिकारी,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.श्रीहरी बहिरट, पोलीस उप-निरीक्षक, अजितकुमार पाटील, पोलीस उप-निरीक्षक,राहुल पवार, पोलीस अंमलदार,संतोष क्षिरसागर, शरद वाकसे, सुजीत पवार, संजिव कळंबे, गणेश शिंदे, साईनाथ कारके, भाग्यश्री वाघमारे यांचे पथकाने केली आहे.